पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, दुरसंचार विभाग,
क्र.दुरसंचार/१/कावि/८८ /२०१२
दिनांक. १० /१०/२०१२

**विषय :-** CCTV यंत्रणेबाबत.

**आदेश,**

पुणे हे दहशतवादी कृत्यांबाबतचे संवेदनशील शहर होत चाललेले आहे. दोन वर्षापुर्वी जर्मन बेकरी येथे बॉम्बस्फोट झाला. तसेच नुकताच जंगली महाराज येथील रस्त्यावर साखळी बॉम्बस्फोट झालेले आहेत. अशाप्रकारच्या दुर्दैवी घटनांमुळे अवागमन असलेल्या / गर्दीच्या व सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट व यामुळे लागणा-या आगी त्यामुळे नागरिकांची जीवितहानी व मोठ्याप्रमाणात मालमत्तेचे नुकसान होते. त्यामुळे अशा घटनांपासुन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे क्रमप्राप्त झाले आहे.

या पार्श्वभुमीवर शहरातील नागरिकांचे मोठ्याप्रमाणात अवागमन, जमावाच्या ठिकाणी व सर्व वाणिज्य अस्थापना या ठिकाणी नागरिकांच्या जिविताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना (Life Safely Measures) करणे अत्यावश्यक आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ४१(२) अनुसार नागरिकांच्या जिविताच्या सुरक्षिततेसाठी महानगरपालिका आवश्यक त्या उपाययोजना करु शकते. शॉर्टसर्किट, बॉम्बस्फोट या सारख्या धटना नंतर आगीची शक्यता पाहता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६३ (५) अनुसार आगी यापासुन जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व साधणे पुरविणे गरजेचे आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ चे कलम ३ अनुसार आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजनांशी संबंधित करावयाच्या उपाययोजनांची तरतुद करावयाचे दायित्व हे इमारतीचे मालक किंवा यथस्थित भोगवटाधारक यांचे आहे.

सबब मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये पिंपरी चिंचवड हद्दीमधिल व परिसरातील वाणिज्य अस्थापना/इमारती उदा. मॉल्स, दुकाने, कंपन्या, विविध कार्यालये, सभागृहे, मंगल कार्यालये, धार्मिक स्थळे, दवाखाने इत्यादींचे मालक किंवा भोगवटादार यांनी या आदेशापासुन एक महिन्याच्या आत त्यांच्या इमारतीच्या सर्व प्रवेशद्वारावर, अंतर्गत भाग, पार्किंग व्यवस्था व महत्वाचे ठिकाणी कमीतकमी एक महीना रेकॉर्डींगची व्यवस्था असलेले कॅमेरे तसेच प्रदर्शने, सभा, गणेशोत्सव इ. तात्पुरत्या स्वरुपाच्या होणा-या कार्यक्रमांसाठीही संयोजकानी CCTV कॅमेरे बसविणे बंधनकारक करीत आहे.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

**प्रत :-** १) अ,ब,क,ड प्रभाग अधिकारी,
२) बांधकाम परवानगी विभाग
३) संगणक अधिकारी
म.न.पा. वेबवर प्रसिध्दिसाठी

आपले प्रभागातील मॉल्स, दुकाने, कंपन्या, विविध कार्यालये, सभागृहे, मंगल कार्यालये, दवाखाने, धार्मिक स्थळे इत्यादींना सदर आदेशाची प्रत बजावुन त्यांनी CCTV यंत्रणा बसविली किंवा कसे याबाबतची माहिती सोबतचे तक्त्यात भरून पुर्तता अहवाल एक महिन्याचे आत सादर करावा.

**प्रति :-**

# आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शहरातील वाणिज्य आस्थापनांची कॅमेरे उभारणी करणेबाबतचे माहिती संकलनाचे परिशिष्ट

| अ.क्र. | वाणिजीक आस्थापनाचा प्रकार | वाणिजीक आस्थापनाचे नाव | संपूर्ण पत्ता | कॅमेरा व यंत्रणेचा तपशील | जवळील खुण (Land Mark) | दुरध्वनी , मोबाईल क्रमांक व इमेलआडी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| एकुण | | | | | | | |

दिनांक :-
कार्यालय:-

स्वाक्षरी/-
खात्याचे नाव व विभागीय / क्षेत्रीय कार्यालय